# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११० वा ❑ मंगळवार दि.१० जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बालविवाह: एक गंभीर सामाजिक समस्या

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

अल्पवयीन मातृत्व एक गंभीर समस्या आहे. याचे सामाजिक, आर्थिक आणि शारीरिक परिणाम अनेक असतात. या समस्यांवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. अल्पवयीन मातृत्व म्हणजे १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीचे आई होणे. ही समस्या अनेक देशांमध्ये पाहायला मिळते.

मुला मुलींची विवाहाची योग्य वय शासनाने अधोरेखित केलेले असूनही आणि बालविवाह कायद्याने गुन्हा आहे त्यात शिक्षा होऊ शकते हे माहीत असूनही आजही समाजामध्ये बालवविवाह होत आहे. बालविवाह कायद्याने गुन्हा असून देखीलअनेकपालकआपल्या मुलींचा विवाह कमी वयातच अर्थात अठरा वर्षाच्या आत करून देतात त्यामुळे अल्पवयीन मुलीं बालवयातच आई बनत असते. बालविवाह विरोधात कायदा अस्तित्वात असूनही अजूनही कित्येक प्रदेशांमध्ये बालविवाह सर्रास होताना दिसतात.

**अलिबाग मध्ये पाच महिन्यात ९७ कुमारी माता**

अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात ९७ अल्पवयीन मुलींची प्रसूती झाली असून या आकडेवारीने समाजाची मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे सिद्ध होते.

अल्पवयीन वयात मातृत्व स्वीकारणाऱ्या मुलींच्या जीवनावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता असून यामागे बालविवाह लैंगिक शोषण सामाजिक उदासीनता स्पष्ट दिसत आहे.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या २०२२ मध्ये जारी केलेल्या आकडेवारीनुसार गोव्याचा ७.१ हा अल्पवयीन बलात्कार दर देशात सगळ्यात जास्त आहे. गोव्यात २०२२ मध्ये ७५ बलात्काराच्या घटनांची नोंद झाली, त्यापैकी ५७ म्हणजेच ७६ टक्के पीडित १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या अल्पवयीन मुली होत्या.

**गोव्यात किशोर वयीन मुलींची आकडेवारी**

स्वतःच्या मर्जीने लैंगिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या गोव्यातील किशोरवयीन मुलींचा आकडाही उल्लेखनीय आहे. प्रसारमाध्यमे, इंटरनेट, सोशल मीडिया, ओटीटी इत्यादीमार्फत लैंगिक संबंधांबद्दलची माहिती अतिशय कमी वयात मुलांपर्यंत पोहोचते.

खेदाची गोष्ट ही की या माध्यमांद्वारे ही माहिती योग्य प्रकारे क्वचित आणि विकृत, बीभत्स प्रकारेच जास्त करून दिली जाते. नैसर्गिक आकर्षण तर असतेच, मग स्वतःच्या बौद्धिक कुवतीनुसार या साऱ्यांचा अर्थ लावून मुलं लैंगिक प्रयोग करण्यास प्रेरित होतात. समवयस्काबरोबरच्या लैंगिक संबंधात जास्त करून मुलींएवढेच मुलगेही तसे परिणामांच्या कल्पनांची जाण नसलेलेच असतात.

जास्त चिंताजनक गोष्टी ही आहे की गोव्यातील अनेक केसेसमध्ये वयाने मोठे विवाहित पुरुष मुद्दाम ग्रूमिंग करून, गळ टाकून किशोरवयीन मुलींना लैंगिक संबंधांमध्ये अडकवताना आढळत आहेत. किशोरवयच असं असतं की जेव्हा दुसऱ्यांचे लक्ष सतत आपल्याकडे असावं असं वाटतं.

बालविवाह ही केवळ भारतातीलच समस्या नसून जगातील अनेक देशांमध्ये बालविवाह होत असून त्यातून कुमारी मातांचा प्रश्न समोर येत आहे.

२०२२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या युनिसेफच्या अहवालानुसार सुमारे १३ टक्के मुलींवर अशा प्रकारचे मातृत्व लादले जाते. आफ्रिका खंडातील सहारा वाळवंटाखालील देशांमध्ये तर हे प्रमाण २५% आहे; दक्षिण आशियात ते १०% आहे. अशा घटनांमध्ये सुमारे २०% घटना बाललैंगिक अत्याचार या सदरात मोडतात. त्यावरील वयोगटांमध्ये ३३% प्रकरणांमध्ये बलात्कार हे मातृत्वाचे कारण असते.

युनिसेफच्या २०२१च्या माहितीनुसार जगभरात मिळून सध्या हयात असलेल्या स्त्रियांपैकी सुमारे ६५ कोटी महिलांचा बालविवाह किंवा अल्पवयात लैंगिक संबंध झाला होता.

काल वयात मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारातून तिच्यावर मातृत्व लादले जाते. तसेच

दैनंदिन पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण या मूलभूत सुविधा घरांपासून लांब अंतरावर असण्यातून येणारी असुरक्षितता.शाळा घरापासून खूप दूर शाळेच्या वर्गातील मुलग्यांकडून आणि शिक्षकांकडून देखील बलात्काराचे भय संभवते.

प्राथमिक आरोग्य केंद्र सुद्धा दूरच्या अंतरावर असणे आणि तिथली अपुरी वैद्यकीय सुविधा गरिबी हे तर अत्यंत महत्त्वाचे कारण. दारिद्र्यरेषेखालील पालकांकडून आपल्या मुलांच्या मूलभूत गरजा देखील पुरवल्या जात नाहीत. त्यामुळे अशा कुटुंबांमधील काही मुली नाईलाजाने परिचयातील सधन पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवून त्या बदल्यात पैसे आणि इच्छित वस्तू मिळवतात.

बालविवाह सारख्या गंभीर सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अल्पवयीन मातृत्व आणि त्याच्या परिणामांबद्दल जागरूकता वाढवणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गर्भधारणा आणि प्रसूतीसाठी योग्य आरोग्य सेवा उपलब्ध करणे आवश्यक आहे.याशिवाय कुटुंब नियोजन आणि सुरक्षित लैंगिक संबंधांबद्दल माहिती देणे आवश्यक आहे. बालविवाह प्रतिबंध करणे आवश्यक आहे. अल्पवयीन माता आणि त्यांच्या मुलांना सामाजिक आणि आर्थिक आधार देणे आवश्यक आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून मुख्यमंत्र्यांनी केला शुभारंभ

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – भारतीय रेल्वेची गौरव यात्रा अंतर्गत आज पासून सुरू होणारा छत्रपती शिवाजी महाराज सर्किट हा प्रवास सर्व प्रवाशांसाठी एक प्रेरणादायी अनुभव असेल असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव रेल्वेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि स्वातंत्र्य इतिहास जिवंत ठेवण्याचे काम या रेल्वेच्या माध्यमातून होणार आहे. आज या रेल्वेतून सातशे पेक्षा जात प्रवासी प्रवास करत आहेत. यातील ८० टक्के प्रवासी हे चाळीस वर्षाच्या आतील आहेत. जे आज छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पाहण्यासाठी जात आहेत. राज्यातील सर्व भागातून आलेल्या सर्व प्रवाशांना या सर्किट रेल्वेच्या माध्यमातून इतिहास अनुभवण्याची संधी मिळणार आहे. शिवराज्याभिषेकास ३५१ वर्ष पूर्ण होत आहेत. आजच्या या दिवशी ही रेल्वे सुरू होत असल्याचा आनंद आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मोगल, परकीय आक्रमकांना पराभूत करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढे हे स्वराज्य अटकेपर्यंत विस्तारले. ही गौरव यात्रेचा आजचा मुक्काम रायगड येथे असणार आहे. तसेच या यात्रेत शिवनेरी, लालमहाल, पुण्याची शिवसृष्टी अशा महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देणार आहे. तर कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन ही होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबतच राज्याचे संस्कृती कार्य मंत्री आशिष शेलार आणि त्यांचा विभाग, पर्यटन विभाग यांचे अभिनंदन करतो.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. तसेच या पहिल्याच सर्किट यात्रेत प्रवास करत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदनही केले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच सांस्कृतिक विभागाचे सचिव विकास खारगे, पर्यटन प्रधान सचिव अतुल पाटणे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज कुमार सूर्यवंशी, भारतीय रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना, आय आरसीटीसी चे राहुल हिमालियन, महाराष्ट्र पर्यटन विभागाचे विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी, प्रवासी उपस्थित होते.

रेल्वे मधुन प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे रेल्वे स्थानकावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेकडून पारंपरिक ढोल–ताशा यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. पर्यटकांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना महाराष्ट्र राज्यातील पर्यटनाच्या दृष्टीने तयार करण्यात आलेली माहिती पत्रके वाटून माहीती देण्यात आली. एकूणच उत्साही वातावरणात पर्यटकांना या प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम



आयोजित केले आहेत.

भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाशी समन्वय साधून, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे या गौरवशाली ट्रेनचे हे आगमन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणारे ठरेल.भारत गौरव ट्रेन ज्या–ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहीती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी आयरसीटीसी च्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. ५ दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते महाराजांच्या गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेता येईल

## लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी अशोक वारकर यांची निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – येथील लिनियर गार्डन जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी अशोक वारकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. गोविंद गार्डनच्या परिसरात रविवार दि. आठ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी ही निवड करण्यात आली. संघाच्या नूतन कार्यकारणीमध्ये पांडुरंग कांबळे, अश्विनीताई शेकटकर (उपाध्यक्ष), सुरेश बरडे (सचिव) दगजीराव पाटील, किर्तीमाला मोर (सहसचिव) दिलीप ताम्हाणे (कोष्याध्यक्ष), हरिमोहन तिवारी, सी.व्ही. ब्राम्हणकर (उपकोषाध्यक्ष) प्रदिप बालगुडे (लेखा तपासणीस), सुरेश वाघळकर (प्रमुख सल्लागार) आणि महिला प्रतिनिधी म्हणून छायाताई वायकर या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. कार्यकारणीमध्ये सदस्यपदी रमेश काळे, शरदकांत नेरकर आणि किशोर देशमुख या तिघांचा समावेश करण्यात आला. यावेळी निवडणूक निरीक्षक म्हणून अनिल भोळे यांनी कामकाज पाहीले. सदरील निवडणूक एकमताने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.



## आयुर्वेद हे भारतीय परंपरेचे शास्त्र आहे ; त्याच्या प्रचार व प्रसारासाठी ऐआय तंत्रज्ञान महत्वाचे ठरेल - डॉ. वि.ल. धारुरकर




**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – आयुर्वेदासारख्या विषयात ए आय सारख्या प्रगत उच्च तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे निश्चितच देशातील आयुर्वेद शास्त्राचे महत्व अधोरेखित होईल. असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षण तज्ञ डॉ. वि.ल. धारूरकर यांनी केले. शिवा ट्रस्टच्या यशवंतराव चव्हाण आयुर्वेदिक महाविद्यालयाला देशात एआय ग्रोविंग डॉट्स परखं या ॲप्लिकेशनने प्रथमच जोडण्याचा मान निश्चितच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी, शिक्षक आणि व्यवस्थापन यांचा कौशल्य शिक्षणाचा दर्जा वाढणार आहे आणि आयुर्वेदिक क्षेत्रात एक वेगळी प्रगतीची वाट दिसून येणार आहे, असेही डॉ. धारुरकर म्हणाले.

शिवा ट्रस्टच्या संकुलातील यशवंतराव चव्हाण आयुर्वेदिक महाविद्यालय, राजेश टोपे नर्सिंग विद्यालय तसेच इतर शिक्षणशाखा यांच्यासाठी आयोजित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी शिवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रा. बाळासाहेब पवार, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक तसेच आयआयकेचे संस्थापक अध्यक्ष निलेश छडवेलकर आणि कार्यकारी संचालक संजयकुमार जोशी उपस्थित होते. गुरुवारी दुपारच्या सत्रात २ ते ५ या वेळेत या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विविध प्राध्यापक व इतरांनी त्याचा लाभ घेतला.

डॉ. धारुरकर यांनी भारतीय आयुर्वेद शास्त्राचे महत्व विशद करून केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर कोरोनाच्या पूर्वी आणि कोरोनानंतरच्या सर्वसामान्य नागरिकांना होत असलेल्या महत्वपूर्ण उपयोगाची माहिती दिली तर संजय कुमार जोशी यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील ग्रोविंग डॉट्स परखं हे आधुनिक काळातील एआय तंत्रज्ञानावर आधारित एप्लीकेशन शिक्षण शास्त्राच्या विविध अंगांना किती उपयुक्त आहे त्याची माहिती दिली. आज केवळ महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील विविध संस्था विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांना या माध्यमाचा कसा उपयोग होतो हे सोदाहरण स्पष्ट केले. त्यानंतर या कार्यशाळेत संस्थापक अध्यक्ष निलेश छळवलकर यांनी आयआयके या संस्थेच्या शिक्षण क्षेत्रातील विविध योजना आणि उपक्रमाची माहिती दिली तसेच ग्रोविंग डॉट्स परखं या ॲप्लिकेशनचे डेमो सादरीकरण केले.

शिवा ट्रस्टच्या आमच्या यशवंतराव चव्हाण आयुर्वेदिक महाविद्यालयाला देशात प्रथमच एआय ग्रोविंग डॉट्स परखं या ॲप्लिकेशनने जोडण्याचा मान निश्चितच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज यांच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे आम्ही आमच्या आयुर्वेद महाविद्यालयासोबतच शिवा ट्रस्टच्याआमच्या इतर जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्थांनाही हे लागू करू, असे यावेळी शिवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रा. बाळासाहेब पवार यांनी सांगितले. ग्रोइंग डॉट्स परखं ही एआय प्रणाली आम्हाला उपयुक्त ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांना शैक्षणिक कार्याबद्दल विशेष पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूरचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांना पुणे येथे आयोजित विशेष समारंभात भारत सरकारच्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (एन.एस.डी.सी.), राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण परिषद (एन.सी.व्ही.ई.टी.) आणि कौशल्य भारत यांच्या संयुक्त विद्यमाने प्लस नाईन वन मीडियाचे संस्थापक आणि सीईओ संदीप गुलाटी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी उच्च शिक्षणात राबवलेल्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, समाजाभिमुख कार्य आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून उच्च शिक्षणात राबवलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. शितोळे यांना आत्तापर्यंत अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविले आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी




महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंधांचे सादरीकरण केले आहे. या पुरस्काराबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव संदीप कदम, खजिनदार मोहनराव देशमुख, उपसचिव एल. एम. पवार व ए. एम.जाधव, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी यांनी प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांचे अभिनंदन केले.






– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com




आनंदी पहाट...

## अध्यात्म हे अंतर्गत शक्तीचा स्त्रोत

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्याची परिस्थिती,त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. अध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत.त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. अध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो.

## पर्यावरणाचे सदिच्छा दूत





**ज्योतिर्मय साहित्य**

दिलीपदादा आणि पौर्णिमाताई ज्याला आपण लाल डबा म्हणून हिणवतो त्या लाल बसनेच प्रवास करतात. जवळ जायचं असेल तर शक्यतो पायीच जातात. त्यापेक्षा जास्त अंतर असेल तर सायकल वापरतात. लांबच्या अंतरासाठी लाल बसचा वापर करतात. ए सी तर नाहीच नाही. बसच्या प्रवासात काढलेलं तिकीट सुद्धा ते जपून ठेवतात. त्याच्या पाठकोऱ्या भागाचा त्यांना काहीतरी लिहिण्यासाठी उपयोग होतो. ते तिकीट नंतरही ते फेकून देत नाहीत. रद्दीच्या कागदाची एक पिशवी त्यांनी केली आहे. त्यात ते ठेवतात. पुरेशी रद्दी साठल्यावर रद्दीवाल्याला देऊन टाकतात. त्यांना अमेय आणि सृजन अशी दोन मुले आहेत. अमेय पुण्यात बी एस्सी करतो. सृजन दापोलीच्या शाळेत शिकतो. दोघंही सायकल वापरतात किंवा आपल्या आईवडिलांप्रमाणे बसचा वापर करतात. आपल्या आईवडिलांची साधी जीवनशैली त्यांनीही अंगिकारली आहे. ही दोन्ही मुले इतर सर्वसामान्य मुलांसोबत सरकारी मराठी माध्यमाच्या शाळेतच शिकली. समाजाच्या सर्व स्तरातील मुलांसोबत त्यांना मुक्तपणे शिकू दिले, खेळू दिले. समाजाच्या, निसर्गाच्या सान्निध्यात ती वाढतील याची काळजी घेतली.




जीवन जगण्यासाठी तुम्हाला किती पैसे लागतात असे विचारल्यावर दिलीपदादा हसत हसत म्हणतात. आम्हाला महिना पाच हजार रुपये खूप होतात. त्यातूनही पैसे उरतात. शिवाय आता पुस्तकांची रॉयल्टी, व्याख्यानांचे मानधन वगैरे धरून दहा बारा हजार रुपये मिळतात. एवढ्या पैशांचं काय करायचं हा प्रश्नच पडतो. ते म्हणतात, अर्थार्जन करायचं ते केवळ उदरनिर्वाहासाठीच ! अनावश्यक वस्तूंचा संग्रह करायचा नाही. तुम्ही आम्ही तर चपला, बूट, कपडे, फर्निचर इ. वस्तूंचा किती अनावश्यक साठा करतो. निसर्गाच्या सान्निध्यात जीवन जगायचं. बागकाम करायचं. त्यानं आनंद मिळतो. माणूस हा दिनचर प्राणी आहे. निशाचर नाही. त्यामुळे दिवसा काम करावं. रात्री जागत बसून विजेचा अपव्यय करू नये. दिवसाचा प्रकाश डोळ्यांसाठी चांगला असतो. रात्री काम करण्याने संगणक, मोबाईल वापराने डोळ्यांवर ताण पडतो. दिवसा उपलब्ध असलेल्या सूर्यप्रकाशाचा भरपूर वापर करून घ्यावा. कपडे वाळवण्यासाठी वॉशिंग मशीन न वापरता सूर्यप्रकाशात ते वाळवावेत. भांडी घासण्यासाठी राखेचा वापर करावा म्हणजे तेच सांडपाणी बागेला वापरता येते. शहरातील लोक पाण्याची अक्षरशः नासाडी करतात. कपडे, भांडी धुण्यासाठी नळ सुरूच ठेवतात. गाडी धुण्यासाठी मुबलक पाणी वापरतात. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## नामस्मरणभक्ति

**ज्योतिर्मय साहित्य**


मी कर्ताअसा खोटा दंभ सजवू नका तो खोटा दंभ कधी ना कधी कोमेजून जातो गळून पडतो. मनाच्या गाभ्यातून नामस्मरण करा प्रत्यक्ष सद्गुरू तुम्हाला शोधत येतील. यावर विश्वास ठेवा. असं म्हणतात की काशीक्षेत्रात देह ठेवणाऱ्या माणसाला भगवान शंकरच रामनाम कानात सांगतात व तो मुक्त होतो. म्हणून वाराणशीला मुक्ती देणारे क्षेत्र म्हणतात. वाल्मिकी किंवा वाल्या कोळ्याची गोष्ट तर तुम्हा आम्हाला सगळ्यांना माहिती आहेच ती वेगळी सांगायला नको. भक्त प्रल्हाद भगवंताच्या आशिर्वादाचे ऊत्तम ऊदा. आहे. नामामुळे अजामेळा पवित्र झाला. परत रामायणाकडे वळूया. नामामुळे दगडसुध्दा तरले हे देखील आपल्याला माहिती आहे. भगवंताच्या हजारो नावातील एक नाव त्याचा मनापासून ठाव घ्यावा. जन्माचे सार्थक झाल्या शिवाय रहाणार नाही. प्रत्यक्ष चंद्रमोली भगवान श्री शंकर सुद्धा नामस्मरणाने हलाहलाच्या तापापासून बचावले. म्हणजे कल्पना करा की नामात काय ताकद आहे आपण तर प्रापंचीक माणसं रोज नव आव्हान रोज नवीन समस्या यातून राव व रंक कुणाचीही सुटका नाही. यातुन आधार मिळवण्यासाठी मनाला सचेतन करण्यासाठी नवी ऊभारी आणण्यासाठी नामाचाच आधार आहे. मन विचलीत होत नाही. जगण्याची ऊर्मी वाढते वाईट विचार मनात येत नाही सर्व प्राणी मात्र व आपला प्रपंच सुखाचा करायचा असेल तर नामाशिवाय तरोणोपाय नाही.

आजचा जमाना तर ऐहिक ऊपभोगाचा आहे. त्यात शाश्वत सुख मिळत नाही आणि ज्यांना शाश्वत सुख हवे आहे त्यांना नामस्मरणाने शांती मिळेल.

श्री राम जय राम जय जय राम जय जय रघूवीर समर्थ

समास तिसरा समाप्त

## नाम हाच भगवंताचा अवतार



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या युगात नाम हाच भगवंताचा अवतार आहे. ‘‘सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो‘‘ असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे; त्यावरून असे ठरते की सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेही अस्तित्व असून, त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे.

आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्वच जवळजवळ दुर्मिळ झाले आहे. म्हणजे, ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाले आहेत. मग अवतार तरी कुणासाठी, कसा व्हावा ? याचा अर्थ, अवतार होणारच नाही असे नाही; पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती आणि पूर्वीच्या काळची परिस्थिती यांत फरक आहे. पूर्वी सद्वासना जिवंत होती, पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे, म्हणजे पायाच ढासळला आहे, तिथे कृतीचा प्रश्नच उदभवत नाही. पूर्वी सद्वासना सूक्ष्मपणे का होईना जिवंत होती, पण स्थूल प्रकट कृती दुर्घट झाली होती; त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणेच जरूर होते, आणि अशा वेळी अवतार घेऊन, म्हणजे सगुण रूप धारण करून, भगवंताने कार्य केलेही. आताचा प्रश्न, दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल हा आहे; म्हणजेच कार्य सूक्ष्मातले आहे. म्हणजे जसा रोग तसे औषध किंवा काटयाने काटा काढावा या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातच केली पाहिजे. वासना बदलायला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे; आणि तो म्हणजे भगवंताचे नाम. चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे, आणि त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे; ज्या अर्थी कारण सूक्ष्मातले आहे त्या अर्थी त्याला इलाजही सूक्ष्मांतला पाहिजे, म्हणून नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे, आणि त्याची कास धरणे, म्हणजेच नाम घेणे, हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. आपण आपले प्रेम प्रपंचाकडे लावले आहे, ते नामाकडे लावावे, म्हणजे नामस्मरणात फार आनंद येईल. मनाला नामाची चटक लागली आणि नामाच्या प्रेमातच मन रंगून गेले म्हणजे जन्म सफल झाला.

नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. म्हणून नामधारकाला कलीची बाधा नाही.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## महात्म्यांचा अविर्भाव

**ज्योतिर्मय साहित्य**

म्हणून प्रत्येक व्यक्तीला त्याच्याशी प्रेम संबंध प्रस्तापीत करायचे असतात. हेच ते ब्रह्म आहे. याबद्दल वेद नेती नेती म्हणतात. पण परमात्म्याला अगम्य घोषित केले असले तरी, तो केवळ प्रेमाने वश होतो, ही शिकवण नंद दास यांनी दिली.

त्यांच्या अनेक रचना उपलब्ध आहेत. जसे रसमंजरी, अनेकार्थ मंजरी, श्याम सगाई, भागवत दशम स्कंध, रुक्मिणी मंगल आणि रास पंचाध्यायी.

सर्व संत आपणास

नाम स्मरण करावे,ते सतत करावे असे सांगतात, पण खरेच आपण प्रभूचे स्मरण करतो का?

की केवळ तांत्रिक पद्धतीने नाम उच्चारण करतो? याचा मनोमन विचार करूया.आणि सर्व संताचे चरणी नतमस्तक हाऊयात.

जय हरी,जय जय हरी..

भगवंताची प्राप्ती व्हावी, अक्षय आनंदाचा ठेवा प्राप्त व्हावा असे सर्वांनाच वाटते. पण हे होण्यासाठी सद्गुरूंची कृपा व्हावी लागते.

सर्व ब्रम्हांड जरी भगवंताने निर्मित केलेलं असले तरी त्यात, पृथ्वीवरील आपला भारत देश हा एका अर्थाने भाग्यवंत समजला जातो, कारण या जम्बुद्वीपात वारंवार संतांच्या मांदियाळी निर्माण झाल्या. भगवत भक्तीचा महापुर त्यांनी आणला. त्यांनी स्वतःचा प्रपंच पाहिला नाही, कुठल्याही धनाची अपेक्षा ठेवली नाही. पण सर्वांसाठी, तळमळीने त्यांनी, लोक कल्याणाचे कार्य केले.

भगवान श्रीकृष्णाच्या अष्ट सख्या पैकी पुन्हा अवतीर्ण झालेले अष्ट छाप संत कवी मधील अंतिम कवी यांचा जीवन परिचय, त्यांनी केलेले कार्य, त्यांनी भगवत भक्तीसाठी घेतलेले परिश्रम, याचा आढावा आपण आता घेऊ.

८) श्री चेत्तर(छित) स्वामी :

भगवान श्रीकृष्णाच्या त्यांची जवळच्या आठ सख्या पैकी एक सखा याचा कलियुगातील अविर्भाव छीतस्वामी होत. छित स्वामी हे मथुरेचे पुरोहित होते. स्वभावाने अतिशय उग्र, भांडखोर आणि रागीट होते. ते शिवभक्त होते. त्यांना त्यांचे नंतर झालेले गुरु श्री विठ्ठलदास यांचे लोकांनी केलेले गुणगान सहन होत नसे. एकदा कोणाच्यातरी आग्रहावरून ते विठ्ठलदासाच्या भेटीला गेले .आणि नारळाच्या कवटीत त्यांनी राख भरली. आणि एक खोटे नाणे त्यात टाकून थट्टा करण्याच्या हेतूने त्यांनी विठ्ठल दासाचे दर्शन घेतले. विठ्ठल दासांनी ते खोटे जोडलेले नारळ छिद स्वामींना फोडावयास लावले. नारळ फोडताच, आश्चर्य असे की, त्यात उत्तम ओले खोबरे दिसून आले. आणि जे खोटे नाणे त्यांनी टाकले होते ते ही खऱ्या नाण्यामध्ये रूपांतरित झाले. या प्रत्यक्ष चमत्काराने प्रभावित होऊन छिद् स्वामी यांनी त्याच क्षणी त्विठ्ठल दासांची शरणागती पत्करली. आणि ते त्यांचे परम शिष्य झाले. त्यांची गुरुभक्ती अनन्यसाधारण होती. असे म्हणतात की, बिरबलाचे ते पुरोहित होते. छिदं स्वामी स्वतः श्रीनाथ जी आणि विठ्ठल दास म्हणजे गुरु यात भेद मानीत नसत. एकदा ते बिरबला कडे गेले असताना बिरबलाच्या मुखातून श्रीनाथजी आणि विठ्ठल दासजी हे एक नव्हेत असा भाव प्रगटला. गुरुबद्दलची भक्ती आणि एकनिष्ठा इतकी प्रखर होती की त्यांनी दक्षिणा न घेता ही बिरबलाचे घर सोडले. घरची विपणनावस्था असूनही पुन्हा कधीही ते बिरबला कडे गेले नाहीत .

त्यांची पदे ही भावपूर्ण आणि सरस आहेत. भक्तांना दीपस्तंभ सारखे मार्गदर्शक ठरणारे यांची व्यक्तिमत्व होते. त्यांच्या दृष्टीने परमात्मा श्रीकृष्ण हा नटवर नागर शाम, भक्तांचा परमपुरुष गोपांचा सखा, यादवांना प्रिय आनंद, यशोदेचा लाडका असा लडिवाळ कृष्ण होता. श्रीकृष्ण एक शाश्वत सत्ता आहे. या शाश्वत सत्तेला पूर्वी दोन प्रकारच्या संतांनी भक्ती केली.

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**जगदम्ब नमस्तुभ्यं विशालाक्षि नमो नमः।**
**चारुरूपे नमस्तुभ्यं विश्वरूपे नमो नमः।। ९ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. विशालाक्षी, तुला नमस्कार असो. चारुरूपे, तुला नमस्कार असो. विश्वरूपे तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यमजये विजये नमः।**
**अयोध्ये च नमस्तुभ्यं सिद्धिदात्रि नमो नमः ।। १०।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. विजये तुला नमस्कार असो. जिच्या समवेत युद्ध करण्याची कुणाची शक्ती नाही, (कारण तू स्वत:च शक्तीरूपिणी आहेस.) अशा तुला नमस्कार असो. सिद्धी देणारे तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं जगदुत्पत्तिहेतवे।**
**मोहकर्त्रि नमस्तुभ्यं मोहविनाशकारिणि ।। ११ ।।**

याजगताच्या उत्पत्तीचे कारण अशा तुला हे जगदंबिके, तुला नमस्कार असो. मोह करणारे आणि मोहाचा विनाश करणारे तुला नमस्कार असो.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. **(क्रमशः)**




## बहुगुणी तिळ

**ज्योतिर्मय साहित्य**

तिळाच्या तेलामुळे रक्तातील कोलेस्टेरॉल काबूत ठेवायला मदत होते. तिळात मोनोअनसॅच्युरेटेड मेदाम्ल जास्त प्रमाणात असते. याच्या तेलातील आम्ले रक्तातील कोलेस्टेरॉल वाढू देत नाहीत. यात लोह, मॅग्नेशियम, मॅगनिज, तांबे, कॅल्शियम भरपुर प्रमाणात असते. जुन्या काळात बॅबिलॉन येथील स्त्रिया तरुणपणा व सौंदर्य टिकावे म्हणुन तीळापासून केलेला हलवा खात असत. रोमन योद्धे बल व उर्जेसाठी याचे सेवन करीत.

तिळाचे तेल हे शरीरच्या मसाजसाठी व आरोग्यासाठी वापरतात. अभ्यंग व शिरोधारा या क्रियेसाठी याचा वापर आयुर्वेदात होतो. यात या तेलाला फारच महत्त्व आहे.

तिळाचे काही महत्वाचे औषधीय उपयोग.

१) मुळव्याध होऊन सारखे रक्त पडत असेल तर काळे तीळ कुटून त्याची चटणी लोण्यासोबट खावी.

२) जखम होऊन ती भरून येत नसेल तर तिळाची लगदी तिथे लावून ठेवावी, जखम फार चांगल्या पद्धतीने भरून येते.

३) दातांच्या हिरड्याचे आयुष्य वाढून ते दात मजबूत व्हावेत यासाठी काळे तीळ चावून खावेत, काळे तीळ नियमित चावून खाणाऱ्या लोकांना दातांचे विकार शक्यतो होत नाहीत.



४) तिळाच्या झाडाची पाने आणि मुळे यांचा काढा करून त्याने केस धुतल्यास काळेभोर आणि मुलायम होतात.

५) जिम किंवा व्यायामशाळेत नियमित जाणाऱ्या मुलांनी तिळाचे नियमित सेवन करावे याने शरीरातील मांसधातू उत्तम पद्धतीने वाढतो.

६) लघवीतून पु जात असेल तर तिळाचे सेवन उपयुक्त आहे. तीळ शरीरातील सर्व धातूंना बलदायी असल्याने अशा त्रासदायक विकारात तिळ अमृतासारखा आहे.

७) स्त्रियांना पाळीच्या वेळी वेदना होत असतील तर औषधांमध्ये तिळ वापरतात याने वेदना कमी होऊन पाळी सुकर होऊन जाते.

तिळाच्या तेलाने अभ्यंग

तिळाच्या तेलाने अभ्यंग करणे अत्यंत उपयुक्त असून त्याने त्वचेला आलेला कोरडेपणा निघून जातो. लकव्यासारख्या आजारात तीळ तेलाने नियमित मालिश केल्यास चांगला फरक दिसतो. हाडे मोडली असतील किंवा हाडे झिजली असतील तर तीळसेवन करणे हितकर आहे.

तीळ स्निग्ध असल्याने बाजरीच्या भाकरीला लावून खाण्याची मराठी लोकांची परंपरा अत्यंत उत्तम आहे . थंडीच्या काळात तीळ सेवन करणे अत्यंत हितकर आहे.

**(क्रमशः)**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# वडपौर्णिमा-वटसावित्रीचे व्रत



**ज्योतिर्मय साहित्य**

वड हा अनेक वर्ष आयुष्य असणारा महावृक्ष म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच आपण खूप वर्षांपूर्वीचे जुने वडाची झाडे आजही बघत आहोत. दोनशे ते तीनशे वर्ष जुने वटवृक्ष आजही अस्तित्वात आहेत . अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थांच्या मठातील वटवृक्ष हा खूपच जुना असल्याचे सांगितले जाते. पूर्वीच्या काळी स्त्रिया ३ दिवसांचे व्रत करायच्या मात्र आता पौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया उपवास करुन वडाची पूजा करतात. एक दिवसीय व्रत करतात. वटपौर्णिमा म्हणजे सात जन्म तोच पती मिळण्यासाठी महिलांनी करायचे व्रत. हे व्रत केल्यावर आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळते आणि पुढच्या सात जन्मासाठी आपल्याला तोच पती साथीदार मिळतो अशी धारणा आपल्या समाजात मागच्या बराच काळापासून रुढ आहे. हिंदू पंचांगातील ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा म्हणजे वटपौर्णिमा. या दिवशी वडाच्या वृक्षाला अनन्यसाधारण महत्व आहे. वड हा वृक्ष अनेक वर्ष आयुष्य असणारा भक्कम वृक्ष म्हणून ओळखला जातो.म्हणूनच त्याला आधारवड म्हणतात.

वड पूजनामागे काही शास्त्रीय कारणेही सांगितली जातात. वडाच्या झाडामध्ये ऑक्सिजनचे प्रमाण जास्त असल्याने स्त्रियांनी या झाडाच्या सानिध्यात राहणे चांगले असते. त्यामुळे हे व्रत करणे अतिशय उपयुक्त ठरते. याबरोबरच एकमेकींना वाण दिल्याने आपल्याकडून दान केले जाते असेही म्हणतात. म्हणून या दिवशी सुहासिनी आंब्याचे वाण देतात.

वडाचे झाड ज्याप्रमाणे अनेक वर्षांसाठी जगते त्याचप्रमाणे आपला पतीही दिर्घायुषी व्हावा म्हणून त्याला सुताने बांधून ठेवतात. सुहासिनी सौभाग्य अलंकार परिधान करून देवाची प्रार्थना, तुळशी पूजन करून वडाच्या झाडाजवळ एकत्रित येतात आणि पूजन करतात. त्यानंतर गरजू व्यक्तींना, ब्राह्मणांना आपल्या ऐपतीनुसार दान,दक्षिणा देतात.

वटपौर्णिमेची एक पौराणिक कथाही आहे: अनेक वर्षापूर्वी अश्‍वपती नावाचा राजाच्या आपल्या सावित्री या मुलीला तिचा पती निवडण्याची परवानगी दिली असते. सावित्र अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. त्यावेळी सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा एका अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला होता. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला आणि जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

तिने तीन दिवस उपवास करून व्रत केले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्याबरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला चक्कर आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने सावित्रीला परत जाण्याची विनंती केली. पण तिने पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले.

सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने तथास्तु म्हटले, मागितल्या वर्षाप्रमाणे त्याला सत्यवानाचे प्राण परत करावे लागले.

सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात असे म्हटले जाते.हिंदू धर्मात म्हणजेच हिंदू पौराणिक कथानुसार असे मानले जाते कि वटवृक्ष म्हणजेच ''त्रिमूर्ती''




होय, तर त्रिमूर्ती म्हणजे कोण ? तर भगवान विष्णू, भगवान ब्रह्मा आणि भगवान शिव यांचे प्रतिक आहे. असे म्हटले जाते कि ब्रह्मा या झाडाच्या मुळाशी वास करतात, मध्य भागी भगवान विष्णू आणि वरच्या बाजूला भगवान शिव हे वास करत असतात. अशा प्रकारे वडाच्या झाडाची पूजा केल्यास तिन्ही देवांचे व्रत केल्याचे पुण्य लाभते.

वटवृक्षाचे आयुष्य जास्त असते. पारंब्यांनी त्यांचा खूप विस्तार झाला असतो, आणि अशा वृक्षाची पूजा करून स्त्रिया मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभुदे धनधान्य व मुले नातू यांनी प्रपंच विस्तारित व संपन्न होउदे. अशी प्रार्थना करतात.

सावित्री ब्रह्मसावित्री सर्वदा प्रियभाषिणी ।

तेन सत्येन मां पाहि
दुःख-संसार-सागरात ।

अवियोगो यथा देव सावित्र्या
सहीतस्य ते।

अवीयोगो तथास्माकं भूयात
जन्मनी जन्मनी ।।

वटमुले स्थितो ब्रम्हा वटमध्ये
जनार्दनः।

वटाग्रे तू शिवो देवःसावित्री
वटसंश्रीता ।।

अशी प्रार्थना केली जाते.

या व्रताचे महत्व शास्त्रात आणि पुराणातही याचा उल्लेख केला गेला आहे. जसे कि स्कंद पुराण, महाभारत यांच्यात याचा संपूर्ण पणे उल्लेख हा आपल्याला पाहण्यास मिळेल.

वटपौर्णिमा व्रत साजरा करणे हे विवाहित स्त्री तिच्या पतिवरचे भक्ती आणि प्रेम प्रकट करते.

वटपौर्णिमाच्या दिवशी उपवासाला काय खायला पाहिजे? याचेही काही नियम आहेत...

वटपौर्णिमा या दिवशी सर्व स्त्रिया या उपवास करत असतात, याचे कारण तर आपण पाहिले परंतू या दिवशी उपवासाला काय खावे ? हे बहुतेक कमी लोकांना माहित असेल. या दिवशी फक्त स्त्रिया फक्त फळांचे सेवन हे करत असतात. फळा व्यतिरिक्त काहीच ग्रहण करीत नाही. तसेच गायीचे दूध, दही, तूप, मुळा, आंबा, डाळिंब, मोसंबी, संत्री आणि केळी इत्यादी पदार्थ व्रताच्या वेळी खाण्यासाठी उपयुक्त आहे. केळी या दिवशी जास्त प्रमाणात ग्रहण केली जातात. कारण केळी ही आपण दुधात केळीचे छोटे छोटे पीस बनवून, दुधात थोडी साखर टाकून घेतात.

जेष्ठ महिन्यात आंब्याचा सीजन असतो. त्यामुळे स्त्रिया आंब्याचे रस करून किंवा आंबा कापून हि खाऊ शकतात.

वटपौर्णिमेच्या दिवशी या गोष्टी करू नये याविषयी काही गोष्टी पारंपरिक रीतीने पाळल्या जातात

अनेकदा पाणीही पिऊ नये. क्षार, लवण, मध आणि मांस यांचे सेवन करू नये.आपल्या शरिराला आणि डोक्याला तेल लाऊ नये. विडा खाऊ नये. अंगाला उटी लाऊ नये.

ज्याप्रमाणे ज्या गोष्टींच्या योगाने शारीरिक सामर्थ्य किंवा मनोविकार बळावतील अशा गोष्टी करू नये. या दिवशी राग, लोभ, मोह अणि आळस या गोष्टी करू नये. दिवसा झोपणे या गोष्टी करू नये.

वृक्षाचे संवर्धन व्हावे आणि जतन व्हावे या हेतूने सुद्धा वड पिंपळाच्या वृक्षाची पूजा करण्याची कल्पना आपल्या संस्कृतीत आहे किंवा स्वीकारले आहे या वृक्षाला पवित्र वृक्ष मानले जाते त्यामुळे त्याची सहसा तोड केली जात नाही. म्हणूनच आज-काल शहरी भागात वडाच्या फांद्या तोडून पूजा केली जाते त्याला बराच विरोध केला जात आहे.

आज आपण एकंदरीत समाजातील परिस्थिती बघितली तर अनेक प्रकारे स्त्रियावर अत्याचार, दारु पिऊन स्त्रियांना मारहाण होते. तरीही त्या स्त्रिया आपल्या कुटुंबाच्या मुलाबाळांच्या भल्यासाठी हे व्रत करीत असतात.

वट पौर्णिमा तारीख : १० जून २०२५ रोजी असून..

वट पौर्णिमा तिथी : सकाळी ११:३५ वाजता सुरु होते. व ११जून रोजी दुपारी १:१३ पौर्णिमा तिथी संपते.

***

# शेक्सपियरच्या अभिजात कलाकृतींचा मराठी साहित्यावर गडद प्रभाव - प्रा. डॉ. कैलास अतकरे यांचे प्रतिपादन

## स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला पुष्प ५ वे

**ज्योतिर्मय साहित्य**

**संभाजीनगर** - इंग्रजी साहित्यातील मुकुटमणी विल्यम शेक्सपियर यांच्या अभिजात कलाकृतींचा गडद असा प्रभाव मराठी साहित्यावर पडला आहे, असे प्रतिपादन हायटेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील इंग्रजीचे प्रा. डॉ. कैलास अतकरे यांनी येथे केले. ते केशव प्रभात नगरमध्ये स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेत पाचवे पुष्प गुंफत होते. अध्यक्षस्थानी बबनराव जगाडे होते. आपल्या भाषणात प्रा. अतकरे पुढे म्हणाले की, विल्यम शेक्सपियर यांची बहुतेक नाटके ही दुःखात्मक शेवट करतात आणि कलाकृतींचा जेव्हा दुःखात्मक शेवट होतो, तेव्हा तो प्रेक्षकावर गहिरा प्रभाव टाकतात. इंग्रजी साहित्यातील विल्यम शेक्सपियर यांच्या कलाकृतीने जगभरातील साहित्यावर प्रभाव टाकला आहे, त्यास मराठी साहित्यही अपवाद



नाही. आपल्या भाषणात प्रा. अतकरे यांनी गोपाळ गणेश आगरकर, आचार्य प्र.के. अत्रे तसेच वि.वा. शिरवाडकर यांच्या कलाकृतींची विशेष चर्चा केली. आरंभीचे बिनीचे शिलेदार अण्णासाहेब किर्लोस्कर आणि विष्णुदास भावे यांच्या कलाकृतींवर सुद्धा शेक्सपियरच्या नाटकांचा प्रभाव पडलेला दिसतो. हिंदी चित्रपटांमध्ये ''हॅम्लेट'' च्या प्रभावातून ''हैदर'' हा चित्रपट पुढे आला तसेच ''ऑथेल्लो'' पासून ''ओंकार'' हा हिंदी चित्रपट प्रकाशित झाला. ''मॅकबेथ'' या कलाकृतीची प्रेरणा घेऊन ''मकबुल'' हा चित्रपट आला. विशाल भारद्वाज यांच्या हिंदी चित्रपटावर प्रामुख्याने शेक्सपियरच्या निर्मिती प्रक्रियेचा प्रभाव दिसून येतो. ''नटसम्राट'' ही कुसुमाग्रजांची कलाकृती श्रेष्ठ असून, त्यामध्ये शेक्सपियरच्या आशय अभिव्यक्ती आणि पात्रांची पुनर्रचना करून त्यास त्यांनी देशी स्वरूपात प्रकट केले आहे. कुसुमाग्रजांच्या अभिजात प्रतिभा शक्तीमुळे त्यांनी या अक्षर साहित्याला चांगला न्याय दिला. त्यांनी ''नटसम्राट'' मधील सौंदर्य स्थळांचाही विशेष उल्लेख केला तसेच नटसम्राटच्या मुख्य भूमिकेस डॉ. लागू यांच्यापासून नाना पाटेकर पर्यंत अनेक कलाकारांनी बजावलेल्या भूमिकांचे विश्लेषण त्यांनी केले. डॉ. धारूरकर यांनी केलेली ''नटसम्राट'' ची समीक्षा मौलिक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी विवेक कंडारकर यांनी डॉ. अतकरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शालिवान संशोधन मंडळाचे संचालक डॉ. वि.ल. धारूरकर यांनी त्यांचा परिचय करून दिला आणि प्रास्ताविक केले. विजय जोग यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व्याख्यानाच्या शेवटी विजय जोग यांनी सर्वांचे आभार मानले. या व्याख्यानमालेस सिडको एन-२ परिसरातील ज्येष्ठ नागरिक तसेच तरुण अभ्यासक, संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर (रमाईसुत) यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

**नाशिक** - पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर (प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता, लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने नाशिक नगरीत काळीज माझं साहित्य व साहित्य समुह नाशिक या सामाजिक संस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वर्धापन दिन कार्यक्रमात कवी प्रदीपगुरुजी पिंपळनेरकर यांना नाशिक येथे राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते, कवी, संपादक गुलाबराजा फुलमाळी, गिरणा गौरवचे सुरेश पवार, रविंद्र मालूजंकर , संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा बेंद्रे याच्या उपस्थितीत मानाचा फेटा, शाल श्रीफळ बुके व ट्रॉफी सन्मान पत्र देऊन टाळ्यांच्या कडकडाटात गौरवण्यात आले.




# हसऱ्या मुखवट्या मागील सूक्ष्म वेदनेचा वेध - हसरे दुःख

चार्ली चॅप्लिन याच्या आयुष्यावर आधारित हे पुस्तक हृदयात अविस्मरणीय घर करून गेले. अनेक प्रसंग तर नयनात अश्रू दाटवतात आणि मन सुन्न करणाऱ्या अनेक घटना यात आहेत. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष याचे पूर्ण वर्णन यात आहे. त्यांची आई रंगभूमीवर लिली हर्ले या नावाने प्रसिद्ध गायिका होत्या. त्यांचे नाव हॅना चॅप्लिन, अचानक लिली यांचा आवाज जातो. आणि त्यांच्या आयुष्यात संकटांची मालिका सुरू होते. लिली यांची येशूवर विशेष श्रद्धा असते. त्या मुलांवर येशूच्या शिकवणीचे संस्कार देतात. सिडने हा सावत्र भाऊ असतो. त्यांच्या आईला वेड्याचे झटके आल्यावर त्या दवाखान्यात ऍडमिट होतात त्यांची जबाबदारी त्यांच्या वडिलांनी घ्यावी असा आदेश कोर्ट देते. वडील दुसऱ्या आईसोबत म्हणजे लुईसा सोबत राहत असतात. तिथे अनेक कष्ट बालपणी चार्ली यांना करावे लागले. एक दिवस आणि मध्यरात्री पर्यंत ते घरात एकटे होते ते प्रसंग मनाला घायाळ करतो. बालमनावर अनेक आघात होत राहतात. वडिलांना दारू पिण्याचे व्यसन असते.

बालपणीच्या अशा अनुभवांनी चार्लीला जे शहाणपण आलं ते खूप मोलाचं ठरलं. लुईसा चार्ली ला अनेक काम सांगायची. शनिवार कामामुळे चार्ली ला नको वाटायचा. हँना दुरुस्त होऊन येते. मुलांना सोबत नेते. अनेक वेळा तर त्यांना जेवणासाठी काहीच नसते. असे उपाशी राहून दिवस काढणारे, अतिशय हलाखीच्या परिस्थितीतील दिवस काढल्यामुळे, बालपणी वर्क हाऊस मध्ये काम करण्याचा अनुभव, शालेय जीवनात चूक नसताना देखील बसलेले तीव्र छडीचे फटके यातून चार्ली चॅप्लिन हा सहनशील, शोशिक, संवेदनशील आणि अनुभव संपन्न प्रगल्भ बुद्धिमत्तेचा बनला.

आईच्या मानसिक अस्थिरतेचा परिणाम त्याच्या आयुष्यावर कसा ठसा उमटवून गेला. आईच्या अनेक इच्छा पूर्ण करण्यासाठी केलेली धडपड याचे वर्णन यात आहे. वडिलांच्या निधनानंतर त्यांचे अंत्य विधी करण्यास देखील पुरेसे पैसे नव्हते. तेव्हा आलेला अनुभव, त्याने यशस्वी होण्यासाठी केलेले मूक नाट्य आणि त्यात मिळालेलं यश नंतर त्याचे कार्य विस्तारित बनत गेले.

एका जिप्सी बाईने चार्लीचे भविष्य सांगितले होते. त्याचे भविष्यातील यश आणि चार विवाह होण्याची शक्यता तिने सांगितले. पण नेमकं त्या वेळी हैती केली सोबत प्रेमभंग दुःखामुळे कधीही न लग्न करण्याचा निर्णय घेतला होता. त्याला ते सर्व खोटे वाटले. पण त्याचे भावी आयुष्यात खरोखर चार लग्न झाले. पहिले लग्न माल्ट्रेड, दुसरे लिटी ग्रे, तिसरे पोलार्ड, आणि चौथे उना हिच्याशी झाले. विनोद सम्राट




वैयक्तिक आयुष्यात अतिशय दुःखी होता. त्याला वैवाहिक सुख पहिल्या तीन विवाहात अजिबात लाभले नाही ते लाभले उना सोबत लग्न झाल्यानंतर.

जेव्हा हॅना आणि सिडने जवळ नसायचे तेव्हा डगलस याने मोठ्या भावाप्रमाणे जीव लावला.

चार्लीच्या आयुष्यातील कामाला खरे मनःपूर्वक कौतुक त्याचेच लाभले. चार्ली लोकप्रिय झाला. अलोमोरा या ठिकाणी झालेले त्याचे स्वागत अविस्मरणीय होते. जाईल तेथे त्याला लोकांचे भरभरून प्रेम मिळाले.

एकाच वेळी हास्य उमलवणारा आणि क्षणात अश्रू डोळ्यात निर्माण होण्याची विशिष्ट हातोटी चार्ली कडे होती. तो जे काम करायचा ते मनःपूर्वक करी. हे त्याच्या यशाचे गमक आहे. जॉन बेरी या महिलेनं त्याला दिलेला मनस्ताप खूप विचित्र होता. त्याच्यावर खोटा खटला दाखल करण्यात आला. त्या बदनामीमुळे तो अमेरिका चे घर सोडून देतो. तो स्वीटझरलंड मध्ये मनोरा ऑफ बॅन येथे पंचवीस वर्ष राहिला. त्याचे अनेक चित्रपट मूकपट आहेत. तर काही बोलपट आहेत. त्याचे एक स्वप्न अपूर्ण राहिले. त्यांना येशू ख्रिस्तावर आणि नेपोलियन हिल हे चित्रपट निर्माण करायचे होते. पण चार्ली ते करू शकले नाहीत. युद्धाच्या काळात त्यांना भाषण करण्यासाठी बोलावण्यात आले होते. मम्मीचा खूप छान संदेश त्यांनी त्या भाषणातून लोकांपर्यंत पोचवला.




लोकप्रिय चार्ली खूप काही शिकवून गेला. सर्वांच्या चेहऱ्यावर प्रचंड हास्य उमटवणारे हे असामान्य व्यक्तिमत्व ऑस्कर पुरस्कार मिळवणारे होते. नोकरचाकरांना देखील अतिशय जीव लावणारे होते. त्याच्या कार्याबाबतीत असणारे समर्पण अतिशय कौतुकास्पद आहे. दुःख देखील कसे हसरे बनवता येते हे चार्ली आपणास शिकवून गेला.

पोटात कालवाकालव घडवून आणणारे अनेक प्रसंग मनाला चटका लावून जातात. सर्वांनी वाचावे असे जबरदस्त जिवंत अनुभवांची संस्कारक्षम रुजवण आयुष्याची गोड शिदोरी बनली.

वाचनाचा फार सुरेख अनुभव, मनास तृप्त करून गेला. एक आदर्श व्यक्तिमत्व नखशिखांत कळले.

पुस्तकाचे नाव. हसरे दुःख
लेखकाचे नाव. भा. द.खेर
प्रकाशक. दिलीप माजगावकर
पृष्ठसंख्या. ५१४, किंमत. ५५०

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559